महाराष्ट्र शासन

# राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर
इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९
वेबसाईट : http://www.mahacet.org
ई-मेल : maharashtra.cetcell@gmail.com

क्र.तंशिप्र-१२२१/प्र.क्र.०२२/जाहिर सूचना-८/सीईटी/ १६३० दिनांक- २९/०९/२०२१.

## जाहिर सूचना

शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करीता MHT-CET-2021 ऑनलाईन प्रवेश परीक्षा दिनांक २०/०९/२०२१ ते ०१/१०/२०२१ या कालावधीत सुरु असून ज्या उमेदवारांनी प्रवेश पत्र डाऊनलोड करुन ही परीक्षेस बसू शकले नाहीत अथवा तांत्रिक अडचणीमुळे परीक्षा पुर्ण करु शकले नाहीत, अशा उमेदवारांनी ई-मेलद्वारे, कार्यालयीन दुरध्वनी, केंद्र प्रमुख यांना विनंती आणि स्वत: सीईटी कक्षात येवून प्रत्यक्ष भेटी दरम्यान परीक्षेसाठी बसण्यास अंतिम संधी देण्यात यावी अशी विनंती करण्यात आली आहे.

अशा उमेदवारांना कळविण्यात येते की, उमेदवारांचे शैक्षणिक हित लक्षात घेता पीसीएम व पीसीबी या दोन्ही ग्रुपच्या उमेदवारांना **दिनांक ०१/१०/२०२१ ते ०३/१०/२०२१** या कालावधीत पात्र उमेदवारांनी परीक्षा शुल्क आधी भरल्यामुळे त्यांची नि:शुल्क नोंदणी करुन घेण्यात यावी. याबाबत उमेदवारांना ई-मेल व एसएमएसद्वारे कळविण्यात येईल. **तसेच नोंदणी केलेल्या उमेदवारांना परीक्षा केंद्राच्या उपलब्धते नुसार परीक्षा केंद्र व नव्याने प्रवेश पत्र देवून दिनांक ०९ व १० ऑक्टोबर, २०२१ रोजी पीसीएम ग्रुप व पीसीबी ग्रुपच्या अतिरिक्त सत्रामध्ये परीक्षा घेण्यात येणार आहे.**

**उच्च शिक्षण विभागांतर्गत विविध अभ्यासक्रमांच्या सामाईक प्रवेश परीक्षा दिनांक ०४/१०/२०२१ ते दिनांक ०८/१०/२०२१ या कालावधील घेण्यात येणार आहेत. सदर परीक्षेदरम्यान अतिवृष्टीमुळे अडचणी निर्माण झाल्यास सदर विद्यार्थ्यांची परीक्षा पुन्हा घेण्यात येईल व त्याबाबतची सुचना व वेळापत्रक नव्याने प्रसिध्द करण्यात येईल.**

तसेच पात्र उमेदवारांनी प्रवेशपत्र प्रिंट करुन अंतिम संधीच्या परीक्षेस हजर राहण्याची जबाबदारी वैयक्तीक संबंधीत उमेदवारांची राहील व सदर उमेदवारांचा निकाल सीईटी कक्षाच्या प्रचलित नियमानुसार लावण्यात येईल.

संकेतस्थळ- www.mahacet.org

(चिंतामणी जोशी) भा.प्र.से.
आयुक्त,
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई